**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - १६/१०/२०२३

**दि.१५/१०/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ५६५/२३ भादवि ३९४,३४,५०४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १३/१०/२०२३ रोजी रात्री अंदाजे ०८:३० वा.चे सुमारास भक्ती शक्ती बस स्टॅपच्या अलीकडील मोकळया मैदानाच्या बाजुला रस्त्याच्या बाजुस निगडी, ता.हवेली जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/१०/२०२३ रोजी १६.१४ वा. |
| फिर्यादी | :- | किरण गणपत ओंबळे, वय - २४, धंदा - रिक्षा ड्रायव्हर, रा.तथागत हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं.१, घर नं.२०१, अंकुष चौक, ओटा स्किम निगडी, पुणे, |
| आरोपी | :- | तीन अनोळखी इसम<br>**आरोपी निष्पन्न—**<br>१.युवराज संतोष अडागळे वय-१९ वर्षे ०४ महिने रा. अण्णाभाऊ साठे वसाहत निगडी पुणे<br>२. रोहन बाळासाहेब सावंत वय-१९ वर्षे,रा.मोरया कॉलनी,मोरे वस्ती चिखली,<br>३. मनोज रामा साठे वय-२४ वर्षे,रा. अण्णाभाउ साठे वसाहत निगडी ता-हवेली जि पुणे<br>**आरोपी क्रं १ ते ३ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी अनोळखी इसम ०३ काळया रंगाचे पल्सर मो.सायकलवर येवुन फिर्यादीस विचारले की,तु कुठे राहतो. असे म्हणाल्यावर फिर्यादीने १ नंबर बिल्डींग मध्ये राहतो असे त्यांना सांगितले असता आरोपी फिर्यादीस पैसे मागु लागले तेंव्हा फिर्यादीने त्यास विरोध केला असता "याला जास्त घमंडी आहे" असे म्हणुन सदर तिघा अनोळखी इसमांनी मिळुन फिर्यादीस शिवीगाळ करीत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी मो. सायकलवर बसलेल्या गुलाबी रंगाचा शर्ट घातलेल्या इसमाने मो.सायकलला असलेला लोखंडी रॉड काढुन सदर रॉडने फिर्यादीचे तोंडावर व पाठीवर शरीरावर ठिक-ठिकाणी मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीचे पॅन्टच्या खिशातील ७,०००/-रू. रोख रक्कम जबरदस्तीने काढुन घेवुन निघुन गेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि थिटे मो नं.-९९७०६६९८०९ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ६२३/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३९४,५०४, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १३/१०/२०२३ रोजी रात्री २१:३० वा. चे सुमारास खराबवाडी, वाघजाईनगर,येथील योशिका कंपनीचे जवळ,ता. खेड, जि. पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि. १५/१०/२०२३ रोजी०३.४७ वा. |
| फिर्यादी | :- | अशोक जगदीश चौधरी वय- २८ वर्षे धंदा- जिलेबीविक्री, सध्या रा. निघोजे, निघोजे मोई रोड, आर्या हॉस्पीटल जवळ ता. खेड, जि. पुणे मुळ रा. पालासनी ता.भिलाडा, जि जोधपूर (डांगजवास पो.स्टे.) राजस्थान |
| आरोपी | :- | १) अनिकेत ऊर्फ बबन केसवड ,२) संकेत कड ,<br>३) आकाश राजगुरु सर्व रा. खराबवाडीता. खेड, जि पुणे, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी आरोपी मजकुर यांना तुम्ही मुलांना धक्काबुक्की का करत आहेत असे विचारलेचे कारणावरुन यातील आरोपी मजकुर यांनी संगणमत करुन फिर्यादी यांस शिवीगाळी करून, लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यातील आरोपी क्रं २ याने हातात काठी घेवून आरोपी क्रं १ याने त्याचे हातात विट घेवून व आरोपी क्रं ३ याने दगडाने फिर्यादीचे अंगा खांदयावर व डोक्यास मारहाण करुन, फिर्यादीस दुखापत |

करुन, फिर्यादीचे खिशात जिलेबी विक्रीची व साहीत्य घेण्यासाठी जवळ ठेवलेली रोख रक्कम २५,०००/- रु जबरदस्तीने काढून घेऊन आरोपी हे त्यांचे जवळील ॲक्सेस स्कूटी मोटार सायकलने खराबवाडीगाव चे दिशेने पळून गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोलीस उपनिरीक्षक किरण शिंदे ७५०६९७४७९०

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ६७६/२०२३,भा.द.वी कलम,३९४,४५४,४५७,३८०,३२४,३२३,३४,५११, प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १)दि.०४/१०/२०२३ रोजी २१.०० वा.ते दिनांक ०५/१०/२०२३ रोजी सकाळी ९.०० वाजताचे दरम्याण व दि.१५/१०/२०२३ रोजी रात्रौ.०१/०० वाजता गट नंबर ९११ हरगुडेवस्ती कुदळवाडी चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दि.१५/१०/२०२३ रोजी १८/१० वा

फिर्यादी :- अजिझु रहिमान उबैदुल्ला खान, वयः-३६ वर्षे, धंदाः- बर्मा इंटरप्रायझेस मालक, राह. फ्लॅट नं. ५०५, कस्तुरी फ्लोरा, मोरे पाटिल चौक, कुदळवाडी,

आरोपी :- १)सनी विनोद गौड, वय-१९ वर्ष, रा.बालाजीनगर झोपडपट्टी दत्तमंदीराजवळ एमआयडीसी भोसरी पुणे,
२)संजय रानावत पुर्ण नांव पत्ता माहीती नाही.
३) विशाल रा पुर्ण नांव पत्ता माहीती नाही

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ याने त्याचे साथिदार आरोपी क्रं २ व ३ यांचेशी संगणमत करुन कार्बाईड इनसर्ट या नावाचे एकुन २०० कि.ग्रॅ. वजनाचे एकुन १,५०,०००/- रु.कि.चे स्क्रॅप घरफोडी चोरी करुन घेवुन गेले व त्यानंतर २) दि.१५/१०/२०२३ रोजी रात्रौ.०१/०० वा.सुमा.इसम आरोपी क्रं १ हा चोरी करण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे शॉपमध्ये प्रवेश केला असता त्यास फिर्यादी याने रंगेहाथ पकडले तेव्हा आरोपीने फिर्यादी व साक्षिदार यांचेसोबत झटापटी करुन फिर्यादी व साक्षिदार धनीराम वर्मा असे दोघांना शॉपमधील रॉडने उजवे पायास मारहान करुन किरकोळ जखमी केले तसेच साक्षिदार मगरुराम वर्मा याचे उजवे हाताचे दंडास चावा घेवुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांची आपआपसात झालेले झटापटीमध्ये इसम आरोपी क्रं १ याचे डोक्यात, डोळयाचेवर, नाकावर मार लागुन तो जखमी झाला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- ए.के.पुजारी ,पोलीस उपनिरीक्षक, ९७६४४८४२७७

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी ५९३/२०२३भा.दं.वि कलम३२५,३२४,५०४,५०६,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१४/१०/२०२३ रोजी ११/१० वा.चे सुमारास गणपती मंदिरा जवळ, म्हाळसाकांत कॉलेज जवळ, प्राधिकरण निगडी पुणे

गुन्हा दाखल :- दि.१५/१०/२०२३ रोजी १८.५६ वा

फिर्यादी :- सनी गणेश शिंदे, वय-१९ वर्षे, व्यवसाय- शिक्षण, रा. सीताबाई चाळ, शिवम बारच्या शेजारी सानेकॉलनी, सानेचौक, चिखली पुणे

आरोपी :- १)आर्यन यादव, २)मनिष उबाळे, ३)रोहित मुठ्ठे, ४)हितेश रोकडे सर्व रा.टावर लाईन, मोरेवस्ती चिखली पुणे (पुर्णनाव व पत्ता माहित नाही ) **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे चहा पिण्यासाठी गणेश तलावकडे जात असताना त्याचे मित्र वरद सुनिल सोनवणे व आशिष आण्णासाहेब सुर्के यांना नमुद आरोपी हे मारत असताना, फिर्यादी हे भांडण सोडवण्याकरीता गेले असता,नमुद आरोपी यांनी फिर्यादी व वरद सोनवणे व आशिष सुर्के यांना हाताने व लाथा बुक्याने व सिमेंटच्यागट्टुने मारहाण केली तसेच आरोपी क्र ३ यांने फिर्यादीचे नाकावर सीमेंटचा गट्टु फेकुन मारला असता, तो सिमेंटचा गट्टु फिर्यादीच्या नाकावर लागल्याने फिर्यादीच्या नाकाचे हाड फ्रक्चर झालेले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पो.ना.१९१९ बाळासाहेब नंदुर्गे ८१०८७८३४४४

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी १०२६/२०२३ भादवि कलम ३२६,३४ भारतीय शस्त्र अधि ४(२५) क्रिमीनल लॉं अमि ३,७ म पो अधि३७(१),(३)सह १३५,१४२

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/१०/२०२३ रोजी रात्री ००/३० वा महिद्रा अँन्थिया सोसायटी गांधीनगर पिंपरी येथील टपरीसमोर

गुन्हा दाखल :- दिनांकः- १५/१०/२०२३ रोजी १२/०५ वा.

फिर्यादी :- तुषार राजु बनपट्टे वय २२ रा भागवत गीता मंदिरासमोर बनपट्टे चाळ खराळवाडी पिंपरी पुणे

आरोपी :- वैभव हातगळे वय २५ व त्याचे इतर तोंड ओळखीचे साथीदार
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद केले ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादीचा मिञ करण विठ्ठल बनपट्टे असे गांधीनगर पिंपरी येथील टपरीसमोर आईस्किम खात उभे असताना गांधीनगर झोपडपट्टीमधुन यातील आरोपी मजकुर हे हातात कोयते फिरवत दहशत करत आले व म्हणाले की आम्ही या एरियाचे भाई आहोत. असे म्हणुन काहि एक कारण नसताना दहशत पसरविण्याकरीता यातील आरोपी नं १ याने त्याच्या हातातील लोखंडी कोयता फिर्यादीचे डोक्यात मागील बाजुस मारुन फिर्यादीचे डोक्यात आपखुशीने जबर दुखापत केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोलीस उपनिरिक्षक गिरी ८४४६७१४०३५

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ६२२/२०२३ भा.दं.वि.सं.कलम २७९, ३०४ (२),मो.वा.का. कलम १८४, १३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१४/१०/२०२३ रोजी १९:१५ वा. ते १९:३० वा. चेदरम्यान भांबोली फाटाते एच.पी. चौकजानारे रोडवर सावरदरीगावचे हद्यीत एअर लिक्वीड चौक येथे.,ता. खेड, जि. पुणे.

गुन्हा दाखल :- दि.१५/१०/२०२३ रोजी००.३९ वा.

फिर्यादी :- निवृत्ती महादेव बैलमारे वय ३८ वर्षे व्यवसाय नोकरी रा. मोशी, बो-हाडेवाडी, बालाजी विश्वा सोसायटी, फलॅट नं. बी. ९०५, ता. हवेली, जि. पुणे. मुळगाव बैलमारखेड, ता. भतकुली, जि. आमरावती

आरोपी :- अज्ञात वाहनावरील अज्ञात चालक

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी भांबोली फाटा ते एच.पी. चौक जानारे रोडवर सावरदरीगावचे हद्यीत एअर लिक्वीड चौक येथे चुलत भाऊ अतुल ज्ञानेश्वर बैलमारे वय ३३ वर्षे रा. नाणेकरवाडी, आयकॉन सिटी, ता. खेड, जि. पुणे हे प्रोटाडी इंडस्ट्रीत भांबोली येथुन त्यांची बुलेट मोटार सायकल नं. एम.एच.२७/सी.एम.०१३० वरुन जात असताना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने ठोकर देवुन, अपघात करुन अतुल बैलमारे यास गंभिर जखमी होणेस कारणीभुत होवुन, अपघातानंतर त्यास उपचाराची अवश्यकता आहे हे माहित असुन सुध्दा उपचारास न नेता त्याचे मरणास कारणीभुत झाला व अपघाताची खबर पोलीस ठाणेस न देता निघुन गेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जाधव ९७६६०३७६२३

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- ११५५/२०२३ भा.द.वि.क. ३३७,३२३,५०९,१४२,१४३,१४६,१४७,१४९,५०४,५०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१४/१०/२०२३ रोजी २१.४५ वा स पंजाबीझ हॉटेल, पुणे बंगळुर रोड, सुतारवाडी पाषण ता.मुळशी जि. पुणे

गुन्हा दाखल :- दि.१५/१०/२०२३ रोजी ०४.३१ वा

फिर्यादी :- निरंजन संजीवन हर्षे, वय ४२, धंदा नोकरी, रा - फलॅट नं १२, जगदिश नगर, औंध पुणे,

आरोपी :- १)स्वप्नील शंकर बिराजदार वय ४० वर्षे रा. फ्लॅट नं. ए/३०४ इनसिग्निया सोसा. विनोदेनगर वाकड पुणे
२) श्लोक सुदेश होणराव वय २७ वर्षे रा. ए/१०३ यशोदा कॉम्पेक्स सदाशीव दांगट नगर वडगाव पुणे
३) सिध्दार्थ संतोष होणराव वय ३६ वर्षे रा. फ्लॅट नं. ४०२ सोनीया कॉम्पलेक्स गुलटेकडी पुणे
४) सम्राट सतीष होणराव वय ३४ वर्षे रा. फ्लॅट नं. ४०२ सोनीया कॉम्पलेक्स गुलटेकडी पुणे

५) शंतनु संदिप होणराव वय ३१ वर्षे रा. ६५ गोकुळ बंगला मुकुंदनगर स्वारगेट पुणे
व इतर दोन अनोळखी इसम **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचे मैत्रीण नामे गौरी, पत्नी अपुर्वा असे जेवण करण्यासाठी पंजाबीझ हॉटेल, पुणे बंगळुर रोड, सुतारवाडी पाषण येथे गेलेलो होतो तेथे फिर्यादी हे स्मोकींग झोनमध्ये सिगरेट पिण्यासाठी गेले तेव्हा तेथे लहान मुले खेळत होती म्हणुन वेटरला त्यांना खाली पाठविण्यास सांगितले वेटरने त्यांना खाली पाठविले त्यानंतर त्या मुलांचे पालक नमुद आरोपी यांनी त्यांच्या मुलांना खाली का पाठविले याचा राग मनात धरुन फिर्यादी यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली तसेच फिर्यादी यांची पत्नी अपुर्वा हि भांडण सोडविण्यासाठी मध्ये आली तेव्हा तिला देखील त्यांचा धक्का लागला तसेच फिर्यादी यांची मैत्रीण नामे गौरी हिला अश्लील शिवीगाळ करुन त्यातील चेक्स शर्ट घातलेल्या इसमाने फिर्यादीचे मित्र नामे आशिष याच्या डोक्यात काहीतरी फेकुन मारुन त्याच्या डोक्याला दुखापत केली तसेच फिर्यादी यांना वांरवांर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि काकडे ९९७५७७२४६४

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ५३७/२०२३ भा.द.वी कलम ३७९ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- नोव्हेबर २०२२ ते सप्टेंबर २०२३ चे दरम्यान बॅट-या ढोले पाटील सबवे जुनी सांगवी,बॅक ऑफ महारष्ट्र चौक जुनी सांगवी,भगतसिंग चौक/कल्पतरु चौक,, स्वराज गार्डन चौक जे.बी.१ पिंपळे सौदागर, म्हसोबा चौक,स्वराज गार्डन चौक जे.बी.२, गोविंद गार्डन चौक पिंपळे सौदागर, पी.के.चौक जे.बी.१ पिंपळे सौदागर,पी.के.चौक जे.बी.२ पिंपळे सौदागर, कल्पतरु चौक जे.बी.२ पिपळे सोदागर, काटे पेट्रोल पंप पिंपळे सौदागर, इत्यादी ठिकाणी

गुन्हा दाखल :- दि.१५/०६/२०२३ रोजी२१/४८वा

फिर्यादी :- सुहास सुरेश केसकर वय-४९ वर्षे धंदा-नोकरी रा.उदय हिलटॉप रेसीडेन्सी, पी-२/६०२, शिंदे वस्ती रावेत के/ऑफ रोशना पवार यांचे रुममध्ये भाडयाने पुणे

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमे-यासाठी सी.सी.टि.व्ही. जंक्शन बॉक्समध्ये बसविलेल्या एच.बी.एल.कंपनीच्या ६५ऋक्ष च्या ५६ बॅट-या व १००ऋक्ष च्या १२ बॅट-या अश्या एकुण ६८ बॅट-या व ११ लिंकसेट लोखंडी जंक्शनचे लॉक उघडुन कोणीतरी अज्ञात चोरटयानी फिर्यादीचे व कंपनीचे संमतीशिवाय १,९०,०००/- रु किं चे बॅट-या चोरुन नेले आहेत म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ जगताप, ९७६४००५३९५

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ८०८/२०२३ भा.द.वि कलम २७९,३३८, ३०४(अ) मोटार वाहण का क १८४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १४/१०/२०२३ रोजी सायंकाळी १८/३० वाचे सुमारस खेड ते चाकण जाणारा रोडवर रोड ओलांडत असताना मौजे वाकी बु गांवचे हद्दीत चौधरी धाब्या जवळ खेड

गुन्हा दाखल :- १५/१०/२०२३ रोजी ००/२३ वा

फिर्यादी :- दिपक रघुनाथ टोपे वय २८ वर्षे धंदा- चालक रा. वाकी बु ता. खेड जि. पुणे

आरोपी :- संतोष रामकुमार शाहु वय ४० वर्षे धंदा- चालक रा. बांद्रा मुंबई
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे वडील नामे रघुनाथ राजाराम टोपे वय ४८ वर्षे हे मौजे वाकी बु गांवचे हद्दीत चौधरी धाबा समोर नाशिक पुणे हायवे रोडवरती पायी रोड ओलांडीत असताना खेड बाजुकडुन चाकण बाजडुकडे जाणारी कार नंबर एम एच ०१ ई ई ७५७६ यावरील चालक नामे- संतोष रामकुमार शाहु वय ४० वर्षे यांनी त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगात हयगयीने रस्त्याचे परिस्थिकडे दुर्लक्ष करुन

चालवुन कारची वडीलांना धडक देवुन त्यास  अपघातात गंभिर मार लागुन जखमी करुन फिर्यादीचे  वडीलास मरणास  कारणीभुत झाला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि डेरे ८८३००६९२०१